श्री ज्ञानदेव हरिपाठ

ध्यान

सुंदर ते ध्यान उभे विटेवरी । कर कटेवरी ठेवून या ॥१॥

तुळशी हार गळा कासे पितांबर । आवडे निरंतर हेचि ध्यान ॥२॥

मकर कुंडले तळपती श्रवणी । कंठी कौस्तुभमणी विराजीत ॥३॥

तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीने ॥४॥

॥ एक ॥

देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी । तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥१॥

हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा। पुंण्याची गणना कोण् करी ॥२॥

असोनि संसारीं जिव्हे वेगु करी । वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ॥३॥

ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणा । द्वारकेचा राणा पांडवांघरीं ॥४॥

॥ दोन ॥

चहूं वेदीं जाण साहीशास्त्रीं कारण । अठराही पुराणें हरिसी गाती ॥१॥

मंथुनी नवनीता तैसें घे अनंता । वायां व्यर्थ कथा सांडी मार्गु ॥२॥

एक हरि आत्मा जीवशिव सम । वायां तू दुर्गमा न घाली मन ॥३॥

ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ । भरला घनदाट हरि दिसे ॥४॥

॥ तिन ॥

त्रिगुण असार निर्गुण हें सार । सारासार विचार हरिपाठ ॥१॥

सगुण निर्गुण गुणाचें अगुण । हरिवीणें मन व्यर्थ जाय ॥२॥

अव्यक्त निराकार नाहीं ज्या आकार । जेथुनि चराचर हरिसी भजें ॥३॥

ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं । अनंत जन्मांनी पुण्य होय ॥४॥

॥ चार ॥

भावेंवीण भक्ति भक्तिविण मुक्ति । बळेंवीण् शक्ति बोलु नये ॥१॥

कैसेनि दैवत प्रसन्न त्वरित । उगा राहें निवांत शिणसी वायां ॥२॥

सायासें करिसी प्रपंच दिननिशीं । हरिसी न भजसी कवण्या गुणें ॥३॥

ज्ञानदेव म्हणें हरिजप करणें । तुटेल धरणें प्रपंचाचें ॥४॥

॥ पाच ॥

योगयागविधि येणें नोहे सिद्धी । वायांचि उपाधि दंभ धर्म ॥१॥

भावेंविण देव न कळे नि:संदेह । गुरुविण अनुभव कैसा कळे ॥२॥

तपेंवीण दैवत दिधल्याविण प्राप्त । गुजेंविण हित कोण सांगे ॥३॥

ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात । साधूचे संगती तरणोपाय ॥४॥

॥ सहा ॥

साधुबोध झाला तो नुरोनियां ठेला । ठायींच मुराला अनुभवें ॥१॥

कापुराची वाती उजळली ज्योति । ठायींच समाप्ति झाली जैसी ॥२॥

मोक्षरेखे आला भाग्यें विनटला । साधूंचा अंकिला हरिभक्त ॥३॥

ज्ञानदेवा गोडी संगति सज्जनीं । हरि दिसे जनीं वनी आत्मतत्वीं ॥४॥

॥ सात ॥

पर्वताप्रमाणे पातक करणें । वज्रलेप होणें अभक्तासी ॥१॥

नाहीं ज्यांसी भक्ति ते पतित अभक्त । हरिसी न भजत दैवहत ॥२॥

अनंत वाचाळ बरळती बरळ । त्यां कैंचा दयाळ पावे हरि ॥३॥

ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान । सर्वांघटीं पूर्ण एक नांदे ॥४॥

॥ आठ ॥

संतांचे संगतीं मनोमार्ग गति । आकळावा श्रीपति येणें पंथें ॥१॥

रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा । आत्मा जो शिवाचा राम जप ॥२॥

एकतत्व नाम साधिती साधन । द्वैताचें बंधन न बाधिजे ॥३॥

नामामृत गोडी वैष्णवां लाधली । योगियां साधली जीवनकळा ॥४॥

सत्वर उच्चार प्रल्हादीं बिंबला । उद्धवा लाधला कृष्णदाता ॥५॥

ज्ञानदेव म्हणे नाम हें सुलभ । सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ॥६॥

॥ नऊ ॥

विष्णुविण जप व्यर्थ त्याचें ज्ञान । रामकृष्णीं मन नाहीं ज्याचें ॥१॥

उपजोनी करंटा नेणें अद्वय वाटा । रामकृष्णीं पैठा कैसेनी होय ॥२॥

द्वैताची झाडणी गुरुविण ज्ञान । तया कैचें कीर्तन घडे नामीं ॥३॥

ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान । नामपाठ मौन प्रपंचाचे ॥४॥

भजन

रामकृष्णाहरी । जय जय रामकृष्णाहरी ।।

॥ दहा ॥

त्रिवेणीसंगमीं नाना तीर्थे भ्रमी । चित्त नाहीं नामीं तरी तें व्यर्थ ॥१॥

नामासी विन्मुख तो नर पापिया । हरिवीण धांवया न पावे कोणी ॥२॥

पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मीक । नामें तीन्ही लोक उद्धरती ॥३॥

ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरीचें । परंपरा त्याचें कुळ शुद्ध ॥४॥

॥ अकरा ॥

हरि उच्चारणीं अनंत पापराशी । जातील लयासी क्षणमात्रे ॥१॥

तृण अग्निमेळें समरस झालें । तैसें नामें केलें जपतां हरि ॥२॥

हरि उच्चारण मंत्र पै अगाध । पळे भूतबाधा भेणे तेथें ॥३॥

ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ । न करवे अर्थ उपनिषदां ॥४॥

॥ बारा ॥

तीर्थ व्रत नेम भावेंविण सिद्धि । वायांचि उपाधि करिसी जनां ॥१॥

भावबळें आकळे येऱ्हवीं नाकळे । करतळीं आंवळे तैसा हरि ॥२॥

पारियाचा रवा घेतां भूमिवरी । यत्न परोपरी साधन तैसें ॥३॥

ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण । दिधलें संपूर्ण माझे हातीं ॥४॥

॥ तेरा ॥

समाधि हरिची सम सुखेंवीण । न साधेल जाण द्वैतबुद्धि ॥१॥

बुद्धीचें वैभव अन्य नाहीं दुजें । एका केशवराजें सकळ सिद्धि ॥२॥

ऋद्धि सिद्धि निधी अवघीच उपाधि । जंव त्या परमानंदीं मन नाहीं ॥३॥

ज्ञानदेवी रम्य रमलें समाधान । हरिचें चिंतन सर्वकाळ ॥४॥

॥ चौदा ॥

नित्य सत्य मित हरिपाठ ज्यासी । कळीकाळ त्यासी न पाहे दृष्टी ॥१॥

रामकृष्ण उच्चार अनंतराशी तप । पापाचे कळप पळती पुढें ॥२॥

हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा । म्हणती जे वाचा तयां मोक्ष ॥३॥

ज्ञानदेवा पाठ नारायण नाम । पाविजे उत्तम निजस्थान ॥४॥

॥ पंधरा ॥

एक नाम हरि द्वैतनाम दुरी । अद्वैत कुसरी विरळा जाणें ॥१॥

समबुद्धि घेतां समान श्रीहरि । शमदमांवरी हरि झाला ॥२॥

सर्वांघटीं राम देहांदेहीं एक । सूर्य प्रकाशक सहस्ररश्मी ॥३॥

ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा । मागिलिया जन्मा मुक्त झालों ॥४॥

॥ सोळा ॥

हरिनाम जपे तो नर दुर्लभ । वाचेसी सुलभ रामकृष्ण ॥१॥

राम कृष्ण नामीं उन्मनी साधली । तयासी लाधली सकळ सिद्धी ॥२॥

सिद्धि बुद्धि धर्म हरिपाठीं आले । प्रपंची निवाले साधुसंगे ॥३॥

ज्ञानदेवा नाम रामकृष्ण ठसा । येणें दशदिशा आत्माराम ॥४॥

॥ सतरा ॥

हरिपाठकीर्ति मुखें जरी गाय । पवित्रचि होय देह त्याचा ॥१॥

तपाचे सामर्थ्ये तपिन्नला अमूप । चिरंजीव कल्पकोटि वैकुंठीं नांदे ॥२॥

मातृपितृभ्राता सगोत्र अपार । चतुर्भुज नर होऊनि ठेले ॥३॥

ज्ञान गूढ गम्य ज्ञानदेवा लाधलें । निवृत्तीनें दिधले माझे हातीं ॥४॥

॥ अठरा ॥

हरिवंशपुराण हरिनाम संकीर्तन । हरिविण सौजन्य नेणें कांहीं ॥१॥

त्या नरा लाधलें वैकुंठ जोडलें । सकळ घडलें तीर्थाटन ॥२॥

मनोमार्गें गेला तो तेथे मुकला । हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य ॥३॥

ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी । रामकृष्णीं आवडि सर्वकाळ ॥४॥

भजन

विठोबा रखुमाई । जय जय विठोबा रखुमाई ।।

॥ एकोणीस ॥

नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी । पापे अनंत कोटी गेली त्यांची ॥१॥

अनंत जन्मांचे तप एक नाम । सुगम हरिपाठ ॥२॥

योग याग क्रिया धर्माधर्म माया । गेले ते विलया हरिपाठीं ॥३॥

ज्ञानदेवी यज्ञ याग क्रिया धर्म । हरिविण नेम नाहीं दुजा ॥४॥

॥ वीस ॥

वेदशास्त्रपुराण श्रुतिचे वचन । एक नारायण सार जप ॥१॥

जप तप कर्म हरिविण धर्म । वाउगाचि श्रम व्यर्थ जाय ॥२॥

हरिपाठीं गेले ते निवांतचि ठेले । भ्रमर गुंतले सुमनकळिके ॥३॥

ज्ञानदेवी मंत्र हरिनामाचे शस्त्र । यमें कुळगोत्र वर्जियेले ॥४॥

॥ एकविस ॥

काळ वेळ नाम उच्चारितां नाही । दोन्ही पक्ष पाहीं उद्धरती ॥१॥

रामकृष्ण नाम सर्व दोषां हरण । जडजीवां तारण हरि एक ॥२॥

हरिनाम सार जिव्हा या नामाची । उपमा त्या देवाची कोण वानी ॥३॥

ज्ञानदेवा सांग झाला हरिपाठ । पूर्वजां वैकुंठ-मार्ग सोपा ॥४॥

॥ बाविस ॥

नित्यनेम नामीं ते प्राणी दुर्लभ । लक्ष्मीवल्लभ तयां जवळी ॥१॥

नारायण हरि नारायण हरि । भुक्ति मुक्ति चारी घरीं त्यांच्या ॥२॥

हरिविण जन्म तो नरकचि पैं जाणा । यमाचा पाहुणा प्राणि होय ॥३॥

ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड । गगनाहुनि वाड नाम आहे ॥४॥

॥ तेविस ॥

सात पांच तीन दशकांचा मेळा । एक तत्त्वीं कळा दावी हरि ॥१॥

तैसें नव्हे नाम सर्वत्र वरीष्ठ । तेथें कांहीं कष्ट न लागती ॥२॥

अजपा जपणें उलट प्राणाचा । तेथेंहि मनाचा निर्धार असे ॥३॥

ज्ञानदेवा जिणें नामेंविण व्यर्थ । रामकृष्णीं पंथ क्रमियेला ॥४॥

॥ चौविस ॥

जप तप कर्म क्रिया नेम धर्म । सर्वांघटीं राम भाव शुद्ध ॥१॥

न सोडी हा भावो टाकी रे संदेहो । रामकृष्ण टाहो नित्य फोडी ॥२॥

जाति वित्त गोत कुलशील मात । भजकां त्वरीत भावयुक्त ॥३॥

ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं । वैकुंठभुवनी घर केलें ॥४॥

॥ पंचविस ॥

जाणीव नेणीव भगवंतीं नाहीं । हरिउच्चारणीं पाही मोक्ष सदां ॥१॥

नारायण हरि उच्चार नामाचा । तेथें कळिकाळाचा रीघ नाहीं ॥२॥

तेथील प्रमाण नेणवें वेदांसी । तें जीवजंतूंसी केंवी कळे ॥३॥

ज्ञानदेवा फळ नारायण पाठ । सर्वत्र वैकुंठ केलें असे ॥४॥

॥ सव्वीस ॥

एक तत्व नाम दृढ धरीं मना । हरीसी करुणा येईल तुझी ॥१॥

तें नाम सोपें रे राम-कृष्ण गोविंद । वाचेसी सद्गद जपा आधीं ॥२॥

नामापरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा । वायां आणिका पंथा जाशील झणीं ॥३॥

ज्ञानदेवा मौन जप माळ अंतरी । धरोनी श्रीहरि जपे सदां ॥४॥

॥ सत्तावीस ॥

सर्व सुख गोडी साही शास्त्रें निवडी । रिकामा अर्धघडी राहूं नको ॥१॥

लटिका व्यवहार सर्व हा संसार । वायां येरझार हरिवीण ॥२॥

नाम मंत्र जप कोटी जाईल पाप । रामकृष्णीं संकल्प धरुनि राहें ॥३॥

निजवृत्ति हे काढी सर्व माया तोडी । इंद्रियां सवडी लपू नको ॥४॥

तीर्थी व्रतीं भाव धरी रे करुणा । शांति दया पाहुणा हरि करी ॥५॥

ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवीं ज्ञान । समाधि संजीवन हरिपाठ ॥६॥

॥ अठठावीस ॥

अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस । रचिले विश्वासें ज्ञानदेवें ॥१॥

नित्य पाठ करी इंद्रायणीतीरीं । होय अधिकारी सर्वथा तो ॥२॥

असावें एकाग्रीं स्वस्थ चित्त मनीं । उल्हासेंकरूनी स्मरण जीवी ॥३॥

अंतकाळी तैसा संकटाचे वेळीं । हरि त्या सांभाळी अंतर्बाह्य ॥४॥

संतसज्जनांनी घेतली प्रचीति । आळसी मंदमति केवीं तरे ॥५॥

श्रीगुरु-निवृत्तिवचन तें प्रेमळ । तोषला तात्काळ ज्ञानदेव ॥६॥

॥ एकोणतीस ॥

कोणाचे हे घर हा देह कोणाचा । आत्माराम त्याचा तोचि जाणे ॥१॥

मी तू हा विचार विवेके शोधावा । गोविंदा माधवा याची देही ॥२॥

देही ध्याता ध्यान त्रिकुटीवेगळा । सहस्त्रदळी उगवला सुर्य जैसा ॥३॥

ज्ञानदेव म्हणे नायनाची ज्योती । या नावेरूपे ती तुम्हीं जाणा ॥४॥

॥ तीस ॥

नामसंकीर्तन साधन पै सोपे । जळतील पापे जन्मांतरीची ॥१॥

न लगती सायास जावे वनांतरा । सुखे येतो घरा नारायण ॥२॥

ठायीचं बैसोनि करा एकचित्त । आवडी अनंत आळवावा ॥३॥

रामकृष्णहरि विठ्ठल केशवा । मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥४॥

याविण आणिक असता साधन । वाहतसे आन विठोबाची ॥५॥

तुका म्हणे सोपे आहे सर्वांहूनी । शहाणा तो धनी घेतो येथे ॥६॥

समापन भजन

ज्ञानेश्वर माऊली । ज्ञानराज माऊली तुकाराम ॥